महाराष्ट्र शासन
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अमरावती**
ई-मेल:-**gmcamravati@gmail.com**

जा.क्र.शावैमहाअ/बांधकाम/१०७ /२६ दि.१९.०१.२०२६

# २६ जानेवारी, २०२६ रोजी प्रजासत्ताक दिन साजरा करणेकरिता आवश्यक सेवां भाडेतत्वावर पुरविणे करिता जाहिर ई-दरपत्रक सूचना

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथे दिनांक २६ जानेवारी, २०२६ रोजी प्रजासत्ताक दिन साजरा करण्याकरिता विद्युतरोषनाई (Electric Lighting), ग्रीनमॅट, रेड कारपेट, १० फुटी बिछायत पडदा इत्यादी सेवा भाडेतत्वावर पुरविण्याकरिता दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदरची निविदा फक्त प्रजासत्ताक दिन साजरा करण्याकरिताच्या कालावधीकरिताच वैध राहील. सदर दरपत्रकावर भविष्यात कोणतेही आदेश निर्गमित होणार नाहीत.

दरपत्रक अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांच्या नावे सादर करावयाचे असून दरपत्रकाच्या लिफाफ्यावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकरिता दिनांक २६ जानेवारी, २०२६ रोजी प्रजासत्ताक दिन साजरा करणेकरिता आवश्यक सेवांकरिता दरपत्रक असे सष्ट नमूद करण्यात यावेत. पुरवठादाराने स्वत:चे नाव व पत्ता लिहावा अशा प्रकारे तयार करण्यात आलेले दरपत्रक दिनांक २२/०१/२०२६ रोजी सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत कार्यालयात आणून देण्यात यावे.

प्रापत होणाऱ्या दरपत्रकातील लिफाफे दि.२३/०१/ २०२६ रोजी दु. १२:०० वाजता अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांच्या दालणामध्ये उघडण्यात येईल. इच्छुक पुरवठादारास सदर सभेस उपस्थित राहता येईल.

जिथे दर द्यावयाचे नाही तिथे इच्छुक नाही असे स्पष्ट नमुद करावे. ती जागा रिकामी सोडण्यात येवू नये. सर्व दर हे एका सेवेकरिता सर्व कर समाविष्ट करुन नमुद करावे. अपुर्ण माहितीसह प्राप्त होणारी दरपत्रक नाकारण्याचा अधिकारी अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे. तसेच यादी मधील काही बाबी किंवा मागविण्यात येणाऱ्या संपुर्ण दरपत्रकाची प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकारी अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे.

दर हे पेनने लिहीन्यात येऊ नये ते प्रिंट केलेले असावे. हस्ताक्षरात लिहिलेले दरपत्रक रद्द करण्यात येईल. दरनिश्चिती झाल्यावर फक्त एकदाच आदेश काढण्यात येईल. आदेश प्राप्त होताच तात्काळ आदेशातील सेवेचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

लिफाफ्यामध्ये आवश्यक कागदपत्रे जसे की, दुकान नोंदणी प्रमाणपत्र (Shop Act), जीएसटी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, आधार कार्ड, उद्यम प्रमाणपत्र यांच्या छायांकित प्रती असणे अनिवार्य राहील. नसल्यास आपले दरपत्रक रद्द समजण्यात येईल.

न्युनतम ठरणाऱ्या पुरवठादारास नमुद विनिदिष्टांप्रमाणे सदर सेवा करणे बंधनकारक राहील. त्याकरिता कोणत्याही प्रकारचा अगाऊचा खर्च या संस्थेमार्फत अदा करण्यात येणार नाही.

सदर दरपत्रकासंबधी आपणास काही तक्रार या कार्यालयास दाखल करावयाची असल्यास प्रथम आपण या कार्यालयात तक्रार संबधी रु. १०,०००/- शासन खाती जमा करावे लागेल. जर आपण दाखल केलैल्या तक्रारीत या कार्यालयास काही तथ्य आढळून आल्यास आपणास आपण शासन खाती जमा केलेली रु. १०,०००/- रक्कम परत करण्यात येईल. तक्रारीमध्ये काही तथ्य न आढळल्यास रु. १०,०००/- रक्कम परत करता येणार नाही व ती रक्कम शासन खाती जमा करण्यात येईल.

NRaut 19.1.2026
( डॉ.एन.जी.राऊत )
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अमरावती

| अ.क्र. | कामाचे नाव | किंमत जीएसटी सह |
|---|---|---|
| 01 | इमारत रोषनाई करिता भाडेतत्वावर लाईटींग पुरविणे | **प्रती मीटर** |
| 02 | 20 फुटी ग्रीन मॅटीन | **प्रति मॅटीन दर नमूद करावा** |
| 03 | रेड कारपेट 100 फुट | **दर** |
| 04 | साईड विछायत पडदा, 12/15 फुटी पाईपसह | **प्रति मिटर दर** |

टिप :- वरील सामान पुरवितांना विशेषत: लाईटींगच्या बाबतीत लाईटींग टाकणे आणि काढणे याकरिता कुठलाही अतिरिक्त खर्च देण्यात येणार नाही. अ.क्र. 2 ते 4 बाबतीत बिछायत करणे याकरिता कुठलाही अतिरिक्त खर्च देण्यात येणार नाही.

19.1.2026

( डॉ.एन.जी.राऊत )
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अमरावती